CCPS An AIChE Technology Alliance
Center for Chemical Process Safety
www.aiche.org/ccps

Process Safety Beacon
http://www.aiche.org/CCPS/Publications/Beacon/index.aspx
उत्पादन क्षेत्रातील व्यक्तिंसाठी संदेश

या आवृत्तीचे प्रायोजक
ioMosaic
www.iomosaic.com

# व्यावसायिक सुरक्षेचे विस्मरण होऊ देऊ नका!

मार्च २०१४

बीकॉनसाठी एक चांगला विषय होईल या विचाराने एका बीकॉन वाचकाने अलिकडेच एका घटनेचे वर्णन पाठविले. एका कारखान्यात दागिने वापरण्यास बंदी असण्याचा सुरक्षा नियम होता. तरीही एका कामगाराने अंगठी घालणे सुरूच ठेवले. तो एका ट्रकमधून बाहेर पडत असताना अंगठी कशात तरी अडकली आणि त्याची करंगळी कापून टाकावी लागली.

दुखापत जरी गंभीर होती आणि तिचा कामगारावरील परिणाम त्याच्या उर्वरित आयुष्यभराचा असेल तरी ही दुर्घटना नियमित बीकॉनचा विषय नाही कारण ती प्रक्रीयेशी निगडीत नाही. तथापि ही घटनेमुळे आम्हाला जाणवते की प्रक्रीया सुरक्षा आणि व्यावसायिक सुरक्षेसह आम्ही सुरक्षेच्या सर्व पैलूंकडे लक्ष दिले पाहीजे. माणसे उंचावरून पडतात, पायऱ्यांवरून पडतात, धारदार वस्तूंमुळे दुखापतग्रस्त होतात, उंचावरून पडणाऱ्या वस्तूंची धडक बसते अशा अनेक घटना ज्यांचा कारखान्याच्या प्रक्रीया तंत्रज्ञानाशी संबंध नसतो. ही माणसेही तेवढीच प्रभावित आणि जखमी होतात जेवढी प्रक्रीयेशी संबंधीत अपघातांतील जखमी माणसे होतात.

जरी बीकॉन प्रक्रीयेशी संबंधीत अपघातांवर केंद्रीत असते तरी व्यावसायिक सुरक्षादेखील महत्वाची असते हे विसरू नका. आपले कार्यस्थळ सुरक्षित करण्यासाठी आपल्याकडे प्रक्रीया आणि व्यावसायिक सुरक्षा या दोन्हीसाठी कार्यक्रम असणे आवश्यक आहे.

शेजारील छायाचित्र वर वर्णन केलेल्या घटनांशी अगदी मिळते जुळते आहे. हॅरॉल्ड लॉइडने या छान चित्रपटातील बहुतेक थरारक दृश्ये स्वतःच केली आहेत अगदी चार वर्षांपूर्वी एका चित्रपटाच्या छायाचित्रीकरणाच्या वेळी एक अंगठा व एका बोटाचा तुकडा गमावूनही!



1923 सालच्या "सेफ्टी लास्ट (सुरक्षा शेवटी)" या शांत विनोदी चित्रपटातील एका प्रसिध्द दृश्यात हॅरोल्ड लॉइड लॉस एंजेलिसमधील रस्त्यावर लोंबकळताना

## आपणास माहीत आहे काय?

➔ मानवी दुखापतींची जोखीम कमी करणे हे उद्दीष्ट असलेल्या कार्यप्रणालींच्या माध्यमातून अपघात प्रतिबंध करण्यावर व्यावसायिक सुरक्षेचा भर असतो.

➔ आग, स्फोट, घातक पदार्थांची गळती आणि उत्पादन प्रक्रीयेच्या रसायन व पदार्थ विज्ञानाशी निगडीत संभाव्य मोठ्या घटनांचा प्रतिबंध करणे व नियंत्रण ठेवणे यांवर प्रक्रीया सुरक्षेचा भर असतो.

➔ प्रक्रीया सुरक्षेतील दुर्घटना खूप मोठी होण्याची संभावना असते व त्यामुळे अनेक माणसे, त्याच बरोबर पर्यावरण व मालमत्तेची हानी होण्याची शक्यता असते. एका प्रक्रीया सुरक्षेतील दुर्घटनेमुळे तुमच्या कारखान्याबाहेरील लोकवस्तीवर परीणाम होऊ शकतो.

➔ काही दुर्घटनांमध्ये व्यावसायिक सुरक्षा व प्रक्रीया सुरक्षा अशा दोन्हीचे गुणधर्म असतात. उदाहरणार्थ, उष्ण ज्वालाग्राही पदार्थ असलेली वाहीनी उघडताना त्या पदार्थाच्या संपर्कात आल्याने कामगाराला दुखापत होऊ शकते तसेच मोठी आग लागू शकते किंवा स्फोट होऊ शकतो.

## आपण काय करू शकता?

➔ कार्यस्थळ सुरक्षित करण्यासाठी कारखान्यातील प्रत्येकाने व्यावसायिक सुरक्षा व प्रक्रीया सुरक्षा या दोन्हीवर लक्ष ठेवणे आवश्यक असते हे कदापि विसरू नका.

➔ सुरक्षा संस्कृती आणि दृष्टीकोन, कामकाजातील शिस्त, सुरक्षित कार्यपध्दती आणि चांगल्या सुरक्षा कार्यक्रमाचे अन्य घटक व्यावसायिक सुरक्षा व प्रक्रीया सुरक्षा या दोन्हींच्या यशस्वीतेसाठी अत्यावश्यक आहेत हे ओळखा.

➔ व्यावसायिक सुरक्षेशी संबंधित अपघातांचे प्रमाण वाढणे हा तुमचा प्रक्रीया सुरक्षा कार्यक्रम तुमच्या अपेक्षेप्रमाणे होत नसल्याचा इशारा आहे हे ध्यानात ठेवा.

➔ तुमच्या कारखान्यातील व्यावसायिक सुरक्षा व प्रक्रीया सुरक्षा कार्यक्रम आणि तो यशस्वी करण्यातील तुमची भूमिका समजावून घ्या.

➔ तुमच्या कारखान्यातील सुरक्षा कार्यक्रमांमध्ये उत्स्फूर्तपणे सहभागी व्हा आणि तुमच्या सहकामगारांनाही सहभागी होण्यास प्रवृत्त करा.

## व्यावसायिक सुरक्षा व प्रक्रीया सुरक्षा – तुम्हाला दोन्ही आवश्यक

AIChE © 2008. सर्व हक्क राखीव. अव्यावसायिक, शैक्षणिक हेतूसाठी वापरण्यास प्रोत्साहन आहे. तथापि CCPS शिवाय अन्य कोणासही पुनर्विक्रीसाठी वापर करण्यास सक्त मनाई आहे. संपर्क : ccps_beacon@aiche.org किंवा ६४६–४९५–१३७१

हे बीकॉन सहसा अरेबिक, अफ्रीकन, चिनी, डॅनिश, डच, इंग्रजी, फ्रेंच, जर्मन, ग्रीक, गुजराती, हिब्रू, इटालियन, जपानी, कोरियन, मालय, मराठी, नॉर्वेजियन, पर्शियन, पोलीश, पोर्तुगीज, रोमानियन, रशियन, स्पॅनिश, स्वीडीश, तेलगू, थाई, तुर्की, आणि व्हीएतनामी इत्यादी भाषांमध्ये उपलब्ध आहे.

This Beacon is translated in Marathi by Mr. S.K. Gulawani, Maharashtra, India.